# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk2@dte.org.in Internet :http/www.dte.org.in


क्रमांक :२/एनजीपी/२००१-०२/५२२

दिनांक : 18 FEB 2002

प्रति,

प्राचार्य,

कै.भाऊसाहेब हिरे स्मरणिका समिती ट्रस्टचे

इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन,

सि.नं.३४१,न्यू इग्लिंश स्कूल जवळ,

बांद्रा (पु) मुंबई-४०००५१.

विषय- शैक्षणिक वर्ष २००१-०२ साठी विना अनुदान तत्वावर मास्टर इन कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन हा अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत

संदर्भ:- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक: पीईसी/२००१/(३५३/०१) तांशि-१, दिनांक ३० जून २००१

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणांस कळविण्यांत येते की , शासनाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्रमांक एफ-इटी-न्यूॲप्रुवल/२००१-२००२, दि.२९/६/२००१ च्या पत्रास अनुसरुन संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ३० जून २००१ अन्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २००१-२००२ मध्ये विना अनुदान तत्वावर मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशन (एम. सी. ए) हा अभ्यासक्रम ३० प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास काही अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.त्यापैकी आपण एमसीए अभ्यासक्रमासाठी रु. २.०० लाख बँक ऑफ महाराष्ट्र शाखा एस.एस. ट्रस्ट, बांद्रा,पूर्व येथे पावती क्रमांक अेबी -८३०९६० दिनांक १७/७/२००१ अन्वये ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत व रु.२०/- च्या स्टॅम्प पेपरवर शर्ती व अटी मान्य असल्याबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेला अभ्यासक्रम सन २००१-२००२ पासुन विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. सदर अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता ३० पर्यंतच मर्यादित राहील.

३. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम ३३८२/११९८३६/(१९०)तांशि-१(अ), दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.

४. शासनाने / विद्यापीठाने विहीत केलेले नियम व अटी पाळणे संस्थेस बंधनकारक राहील.

५. प्रस्तावित अभ्यासक्रमाच्या संल्गनीकरणास संस्थेने मुंबई विद्यापीठ,मुंबई यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मुंबई विद्यापीठ,मुंबई यांचेकडून यथोचित माहिती घेण्यांत यावी.

L. B. H. S. S. TRUST'S
INSTITUTE OF
COMPUTER APPLICATION
INWARD : 50/02.

६. विना अनुदान तत्वावर चालणा-या व्यवस्थापकीय महाविद्यालयांच्या बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व राज्यशासन, विद्यापीठ व तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे नियम, प्रवेश नियम , आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क यासंबंधीच्या निर्णयाचे पालन करणे संस्थेला बंधनकारक असेल.

७. महाराष्ट्र शासन, विद्यापीठ व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या नियमानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेमावे व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना शासन, विद्यापीठ व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या नियमानुसार वेतन व भत्ते तसेच इतर सुविधा देण्यांत याव्यात.

८. तसेच संस्थेबद्दल कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या तक्रारी आल्यास संस्थेविरुध्द कडक कारवाई करण्यांत येईल.

९. संस्थेतील प्रयोगशाळा, कर्मशाळा व आरक्षण कक्ष हे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व विद्यापीठाच्या नियमानुसार आवश्यक ती यंत्रसामुग्री, उपकरणे फर्निचर इ. ची खरेदी करुन सुसज्ज करणे आवश्यक राहील.

१०. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके,नियतकालिके इत्यादी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व विद्यापीठाच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

११. या संचालनालयाने, मुंबई विद्यापीठ,मुंबई किंवा शासन किंवा त्यांनी प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस संस्थेचे निरीक्षण करण्यास व त्या निरीक्षणाअंती आढळून येणा-या उणीवाबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार असतील.

१२. सदर संस्था संचालक,तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहील व संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षा मुंबई विद्यापीठ,मुंबई यांच्यामार्फत घेतल्या जातील.

१३. जर संस्था विद्यापीठाच्या मानकानुसार आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करु न शकल्यास किंवा शासनाने, या संचालनालयाने , संबंधित विद्यापीठाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक आहेत

( न. बा. प्रासेलकर )
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई.

प्रत-

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर
२. कुलगुरु मुंबई विद्यापीठ,मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी..
४. कार्यासन क्रमांक १० व ३, मुख्य कार्यालय, यांना माहितीसाठी.